# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/12/2022 (गुरूवार) सकाळ

---

## चोरी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील सार्वजनिक बांधकाम उपविभागातील भांडार साहित्याची ईमारत काटोल येथे दिनांक २४/०९/२०२२ चे ०२.०० वा. दरम्यान ते दिनांक २६/०९/२०२२ रोजी सकाळी ११.३० वा. दरम्यान नमुद घटनावेळी सार्वजनिक बांधकाम उपविभागातील भांडार साहित्याचे ईमारती मध्ये ठेवलेले एकुण ३३ नग शास्त्रीय व गणितीय उपकरणे व अवजारे किंमती अंदाजे ६०,०००/— रूपयाचे साहित्य कोणीतरी अज्ञात चोराने बाहेरील लोखंडी गेटचे व लाकडी दरवाज्याचे कुलुप तोडून, आत प्रवेश करून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ. वृशाली माणिकराव मानकर, वय ३७ वर्ष, रा. श्रीराम नगर, पंचवटी काटोल यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोलटे मो. नं ८०८०९५५५८९ हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा:— अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील मौजा लोहारीसावंगा येथे दिनांक ३०/११/२०२२ चे १०.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान यातील नमुद घटनावेळी व ठिकाणी यातील फिर्यादी नामे— सौ. सिंधुबाई गुलाबराव वंजारी, वय ३४ वर्ष, रा. लोहारीसावंगा ता. नरखेड यांची दोन्ही मुले नामे—भाग्यश्री व रूपेश असे दोघेही शाळेत जात असताना गावातील आरोपी नामे— ऋषी उकंडराजी बालपांडे, वय ५० रा. लोहारीसावंगा, ता. नरखेड याने काहीही कारण नसतांना शिव्या देणे सुरू केले. फिर्यादी यांनी घटनास्थळी पोहचुन आरोपीला हटकले असता आरोपीने फिर्यादीच्या अंगावर धावुन फिर्यादीस शिवीगाळ करून फिर्यादी यांचा हात पकडुन विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३२३, ५०४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक प्रज्योक तायडे ब. नं. १९४६ पोलीस स्टेशन जलालखेडा मो. नं. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर